
अंक ६ वा ] [ वर्ष २७ वें.

# " श्री साईलीला "

त्रैमासिक




एप्रिल, मे, जून १९५०

वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २७ ] त्रैमासिक—एप्रिल, मे, जून १९५० [ अंक ६ वा

## —: संपादकीय :—

नाहीं कष्टाचा गुमान ।
गोवी भ्रमरा सुमन ।
प्रेम प्रीतीचें बांधलें ।
तें न सुटे कांहीं केलें ।
पदरीं घाली पिळा ।
बाप निर्बळ साटीं बाळा ।
तुका म्हणे भावें ।
भेणें देव आकारावें ।

ज्या भ्रमरास मोठीं लांकडें कोरण्याची भीति नसते त्या भ्रमरास सुगंधी कमळ आपणांमध्यें गुंतवून ठेवतें, याचें कारण म्हणजे जें प्रेमानें बांधलें जातें तें कोणत्याही प्रयत्नानें सुटत नाहीं

जें बालक प्रीतीनें आपल्या बापाच्या पदरास पिळा घालून उभें राहतें त्यावेळीं तो बाप जरी शक्तिवान असला तरी त्याच्या प्रेमानं निर्बल होतो. त्याप्रमाणें शुद्ध भावाच्या बळानें देव निराकार आहे तो भिऊन आकारास येतो असें तुकाराम महाराज म्हणतात.

श्री साई ही प्रेममूर्ती आहे. जप, तप साधनानें का बाबा वश होणार? नुसत्या पोथ्या वाचून अगर मोठमोठाले ग्रंथ वाचून, सते करून, शास्त्रोक्त पूजा करून, नुसत्या दिखाऊपणाच्या आराधनेला देव कधींही वश होणार नाहीं.

परमार्थ=परम+अर्थ,-परम अर्थानें अर्थरूप झालेले जे संत कीं ज्यांच्या शब्दांत पारमार्थिक अर्थ व तेज भरलेलें आहे अशांच्या उपदेशानें अगर सतत सहवासानें देवाकडील रस्ता दिसूं लागेल. त्यालासुद्धां विश्वास किंवा श्रद्धा ठेवणें प्राप्त होतें, आणि श्रद्धा व सबुरी ह्या जोडीनेंच ज्ञान प्राप्त होतें. राम्याला साखर गोड लागते म्हणून सोम्यालाही ती गोडच लागली पाहिजे, असें आपण निश्चयात्मक ठणठणीत आणि खणखणीत म्हणतों. कारण मला साखर गोड लागते या ज्ञानाचा आपल्या बुद्धीला साक्षात् अनुभव येतो खरा. पण यापलिकडे जाऊन सर्व मनुष्यांस साखर गोड लागते असें जेव्हां आपण म्हणतो तेव्हां बुद्धीला श्रद्धेची जोड द्यावी लागते. बुद्धीनें कोणत्याही बऱ्या-वाईटाचा निकाल केल्यावर मनाच्या क्षेत्रांतच पुढील अंमलबजावणीकरितां येणें भाग आहे. म्हणून बुद्धीमात्र ज्ञानाची पूर्तता होण्यास, श्रद्धा, दया, वात्सल्य, कर्तव्य व प्रेम ह्यांची अपेक्षा असते. दारूशिवाय नुसत्या गोळीनें बंदुकीचा बार जसा उडत नाहीं तसें प्रेमश्रद्धादी मनोवृत्तीच्या सहाय्याखेरीज केवळ बुद्धिगम्य ज्ञान कोणालांही तारूं शकत नाहीं.

श्वेतकेतूस त्याच्या बापानें वडाच्या झाडाचें फळ, अव्यक्त व सूक्ष्म परब्रह्म हेंच जन्माचें मूळ कारण आहे हें सिद्ध करण्यासाठीं आणून दिलें.

श्वेतकेतूनें तें फळ फोडून पाहिल्यावर आंत पुष्कळ बारीक बारीक बीं आहे असें सांगितलें.

"त्यांतलें एक बीं घे आणि तें फोडून आंत काय आहे तें सांग" असें बापानें पुन्हां म्हटल्यावर श्वेतकेतूनें त्यांतील एक बीं फोडून "आंत कांहीं दिसत नाहीं" असें उत्तर दिलें. त्यावर "अरे! हें जें तुला कांहीं दिसत नाहीं त्यापासूनच वडाचें हें मोठें झाड झालें आहे" असें सांगून अखेर 'श्रद्धस्व'-यावर विश्वास ठेव असें सांगितलें.

तद्रूपतेशिवाय तत्पदाची प्राप्ति नाहीं व भावनेशिवाय दर्शन नाहीं. आपण देवळांत जाऊन देवाचें दर्शन घेतों. पण तें कसें घेतों? दीन होऊन. तर तें लीन होऊन घेतलें तरच अनन्य दर्शन होतें. आपली लीनता जाऊन दीनता विषयांनीं आणली आणि त्यामुळेंच आम्हीं नेहमीं देव देव करतों (म्हणजे मजला कांहीं देईल ऐशी वासना)! आई-बापांचें दर्शन लीन होऊन घेतों कारण आत्मविचार, आम्ही त्यांचे अंश आहोंत.

अलिकडे नकली मालाला लोक फार मान देत आहेत. जिकडे पहावें तिकडे नकली लखलखाटच फार. वरच्या मुलाम्याला जग भुलून फसत आहे. देव कसा आहे, कुठें आहे याची वेदालासुद्धां कल्पना मिळाली नाहीं; आणि आज पहावें तर जिकडे तिकडे देव अंगांत खेळत आहे. (वारी) 'दत्ताचें, गणपतीचें, साईबाबांचें' वगैरे वारीं येत आहेत. भोळ्या भाबड्या लोकांना फसवून त्यांना लुबाडण्याचा एक सोपा मार्ग आंखला आहे खरा, परंतु ते स्वतः आपली फसवणूक करून घेत आहेत व दुसऱ्याचे विश्वासघाताचें पाप आपल्या शिरावर ओढून घेत आहेत.

श्री तुकोबारायांनीं तर अशा माणसाला चांगलेच तडाखे मारले आहेत.

**अंगीं घेऊनियां वारे दया देती।**
**तया भक्तां हातीं चोट आहे ॥ १ ॥**
**देव्हारा बैसोनि हालविती सुपें।**
**ऐसी पापीं पापें लिंपतीं तीं ॥ २ ॥**
**एकीबेकी न्यायें होतसे प्रचीत।**
**तेणें लोक समस्त भुलताती ॥ ३ ॥**
**तयांचे स्वाधीन दैवतें असतीं।**
**तरी कां मरतीं त्यांचीं पोरें ॥ ४ ॥**
**तुका म्हणे पाणी अंगारा जयाचा।**
**भक्त कान्होबाचा तोही नव्हे ॥ ५ ॥**

'महाराज! मला ब्रह्म (देव) काय तें कृपा करून सांगा असा प्रश्न बाष्कलीनें बाह्यास विचारला. तेव्हां बाह्य कांहीं बोलेना. बाष्कलीनें पुन्हां तोच प्रश्न केला, तरी बाह्य गप्पच! असें चारपांचदां झाल्यावर अखेरीस बाष्कलीस बाह्य म्हणाले कीं, 'अरे! तुझ्या प्रश्नाचें उत्तर मी एवढा एकसारखें देत असतांही तुला तें कळत नाहीं याला मी काय करूं. ब्रह्मस्वरूप कोणत्याही प्रकारें सांगतां येत नाहीं म्हणून शांत म्हणजे गप्प बसणें हेंच खरें ब्रह्म लक्षण! समजलास?' सारांश तोंड मिटून सांगतां येणारें, डोळे पहातनासे झाल्यावर दिसणारें आणि कळूं न लागेसें झाल्यावर कळणारें असें हें दृश्यसृष्टिविलक्षण, अनिर्वाच्य व अचिंत्य परब्रह्म (देव) सामान्यबुद्धीच्या मनुष्यांनीं ओळखावें कसें? दुसऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेंकून आपल्या स्वतःचा—माझ्या अंगांत गुरुवारीं साईबाबा येतात असा उदोउदो करून स्वतःच्या जीवनाचा चिचका करून घेण्यापेक्षां संतसमागम अगर श्रीसाईची नित्य भक्तिभावानें पूजाअर्चा करून स्वतःचा फायदा करून घेणें इष्ट नव्हे काय?

**अर्जुनः—किं तद् ब्रह्म किमध्यात्मं, किं कर्म पुरुषोत्तम।**
**आदिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥**
**अधियज्ञः कथं कोऽत्र, देहेऽस्मिन्मधुसूदन।**
**प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥**

अर्जुन म्हणालाः—(१) हे पुरुषोत्तमा! तें ब्रह्म म्हणजे काय? अध्यात्म म्हणजे काय? कर्म म्हणजे काय? अधिभूत कशाला म्हणावयाचें? अधिदैवत कशाला म्हणतात?

(२) अधियत्न कसा असतो? आणि या देहांत, हे मधूसूदना! कोण (अधिदेह) आहे? आणि इंद्रियनिग्रह करणारे अंतकाळीं तुम्हांस कसें ओळखतात, हें मला सांगा.

ब्रह्माचा अनुभव येण्यास किती सायास लागतात याचा विचार प्रत्येकांनीं करावा. जर अर्जुनासारख्याची ही स्थिति तर आमच्यासारख्या सामान्य माणसांची काय त्रेधा उडेल? परंतु सामान्यजनांकरितां श्रीकृष्णांनीं एकच उपाय सांगितला आहे, "तूं एकट्या मला शरण ये, मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन, भिऊं नकोस" असें अर्जुनासच नव्हे तर अर्जुनाला निमित्त करून सर्वांसच भगवंतानें अखेरचें निश्चित आश्वासन दिलें आहे.

श्री तुकाराम महाराजसुद्धां हेंच म्हणतात—

**जळो तें जाणीव, जळो ते शहाणीव।**
**राहो माझा भाव विठ्ठलापायीं॥**
**जळो तो आचार जळो तो विचार।**
**राहो मन स्थिर विठ्ठलापायीं॥**

फक्त पूर्ण शरणांगती आणि निस्सीम प्रेम पाहिजे आणि हें प्रेम का कोठून बाहेरून आणावयाचें आहे! नाहीं, तें मुळीं उपजतच आहे. फक्त तें नामाच्या घोषणेनें जागृत करावयाचें. नामाचें ठोके अंतःकरणाच्या कवाडावर बसूं लागले म्हणजे आंत निद्रिस्त असलेलें प्रेम जागृत होऊन दार कोण ठोकतों हें पहाण्यास्तव तें बाहेर डोकावूं लागेल. नामाचा पूर्ण चंद्रमा ज्या वेळेस हृदयाकाशांत प्रकाशतो त्या वेळेस या प्रेमसागरास एवढी भरती येते कीं, तिला अंतःकरण पुरें न पडतां ती सर्व शरीरावर पाझरूं लागते. सर्व काया प्रेमानें डंवरली जाते–सप्रेमळ अशी अवस्था नामाच्या योगानें होते. आणि म्हणून हें होण्यास बुद्धीचा प्रवाह भलतिकडे जाऊं न देतां (अंगांत येणें)–तो वाचे-कडे–वाचेस ज्यावेळीं सतत नामाचा वेध लागेल त्या वेळेला बुद्धीला नामाचाच जप लागतो.

**हरि बुद्धिं जपे तो नर दुर्लभ।**
**वाचेसि सुलभ रामकृष्ण।**
**(ह. पा.)**

मन–बुद्धि–चित्त–अहंकार असले बांधारे ओलांडण्यापेक्षां वाचेनें 'श्रीसाई' उच्चार करून साईरूप होणें हेच खरें तत्त्व आहे.

**वेद अनंत बोलिला**
**अर्थ इतुकाचि साधिला**
**विठोबासी शरण जावें**
**निज निष्ठा नाम गावें॥**

सकळ शास्त्रांचा विचार।
अंति इतुकाचि निर्धार।
अठरा पुराणीं सिद्धांत
तुका म्हणे हाचि हेत ॥

(तु)

साईभक्तांनो, आपण वेड्यासारखे, अंगांत वारी आणण्याचा प्रयत्न करूं नका, फक्त आपलें प्रेमसुमन साईचरणीं वहा आणि आलेले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्धीस पाठवा.

—संपादक

संपादक "श्रीसाईलीला"

श्री. डॉ. गव्हाणकर यांस

सप्रेम नमस्कार.

कळावें कीं, मी आपल्या "साईलीला" मासिकाचा वर्गणीदार असून माझी अशी इच्छा आहे कीं आपण, मी "बाबांचीं वचनें" दर तीन महिन्यास पाठवीत राहीन तीं आपण "बाबांच्या कृपेनें" पास करून प्रसिद्ध करावींत; अशी मी आपल्या चरणांपाशीं विनवणी करीत आहें. तरी आपण या गरीबाची एवढी इच्छा पूर्ण कराल अशी आशा आहे. कळावें, लोभ असावा ही विनंति.

आपला नम्र सेवक,

**श्री. श्रीराम बाळ सराफ**

(बाबांच्या आशिर्वादाखालील एक बालक)

## ॥ श्रीसाईबाबांचीं बोधवचनें ॥

१

अंधेऱ्या रात्रीं आकाशांमध्यें पुष्कळ तारे आपल्या दृष्टीस पडतात; पण सूर्योदया-नंतर त्यांतील एकही तारा दृष्टीस पडत नाहीं. म्हणून दिवसा आकाशांत मुळींच तारे नाहींत असें आमच्यानें म्हणवेल काय ? तद्वत् हे मानवा, आपल्या अज्ञानाच्या दिवसांत तुला परमेश्वर दिसत नाहीं म्हणून तो मुळींच नाहीं असें म्हणूं नको !

२

एकच वस्तू, परंतु निरनिराळे लोक त्याला निरनिराळीं नांवें देतात. उदाहरणार्थ पाणी. पाण्याला कोणी 'वारी,' कोणी 'वॉटर,' कोणी 'अक्वा,' कोणी 'नीर' असें म्हणतात. त्याप्रमाणें एकाच सच्चिदानंद वस्तूला कोणी 'ईश्वर,' कोणी 'अल्ला,' कोणी 'हरि,' कोणी 'ब्रह्म' अशी हांक मारून तिचा धांवा करतात.

३

एकदां दोघां गृहस्थांचा सरड्याच्या रंगाबद्दल मोठा कडाक्याचा वाद जुंपला. एकजण म्हणाला, "त्या माडाच्या झाडावरील सरडा तांबडालाल आहे." दुसरा म्हणाला, "छे छे, तूं चुकतोस ! सरडा तांबडा नाहीं, निळा आहे." साधक बाधक प्रमाणानें या वादाचा निर्णय होण्याचा रंग दिसेना, म्हणून हे दोघे त्या झाडाखालीं नेहमीं राहणाऱ्या एका गृहस्थाकडे गेले. दोघांपैकीं एकानें त्या गृहस्थाला विचारलें, "महाराज, या झाडावरील सरडा तांबड्या रंगाचा नाहीं काय ?" "होय" असें त्यानें उत्तर दिलें. नंतर दुसऱ्यानें त्याला पुसलें. "तुम्हीं काय म्हणतां ? हें होईल कसें ? तो सरडा तांबडा नाहीं. तर निळा आहे !" "होय, निळाही आहे" त्या गृहस्थानें पुन्हां विनयपूर्वक उत्तर दिलें. सरडा हा नेहमीं रंग बदलणारा प्राणी आहे, हें त्या गृहस्थाला पक्कें माहित असल्यामुळें त्या दोघांच्या परस्परविरोधी प्रश्नांस "होय" असें एकच उत्तर दिलें. याचप्रमाणें सच्चिदानंद परमेश्वराचीं अनेक रूपें आहेत. एखाद्या भक्तानें त्याचें एकच रूप पाहिलें म्हणजे तेवढेंच त्याचें रूप आहे असें तो मानतो. परंतु ज्या भाग्यवान भक्तानें त्याचीं अनेक रूपें पाहिलीं आहेत, तोच असें म्हणतो, कीं "हीं सर्व रूपें त्या एका परमेश्वराचींच आहेत, आणि तो परमेश्वर अनंतरूप आहे !" परमेश्वर निराकार आणि साकारही आहे आणि त्याचीं सर्व रूपें कोणास कळावयाचीं नाहींत.

४

गॅसचे (धुराचे) दिवे शहरांतील निरनिराळ्या भागांना निरनिराळ्या ज्योतींनीं प्रकाशतात, पण त्या दिव्यांचा प्राण-म्हणजे गॅस हा एकाच सामान्य सांठ्यांतून-ठिकाणांतून येतो. त्याप्रमाणें सर्व देशांतील व सर्व युगांतील धर्मोपदेशक हे ज्ञानदीप आहेत, आणि यांच्यामधून एकाच सर्व शक्तिमान उगमापासून-परमेश्वरापासून-आलेला आत्मप्रकाश पसरत असतो.

५

आंधळ्या कोशिंबिरी (लपंडावा) च्या डावांत गड्यानें एकदां कां म्हातारीला हात लावला, कीं तो राजा होतो; मग हुडकणारा त्याला शिवून 'चोर' करावयाचा नाहीं. त्याप्रमाणें एकदां परमेश्वराचें दर्शन झालें कीं मग ऐहिक बंधनांनीं आम्ही बद्ध होत नाहीं. म्हातारीला स्पर्श केलेल्या गड्याला मनास वाटेल तेथें जाण्याची मुभा असते. त्याच्यामागें लागून त्याला कोणी चोर करीत नाहीं. त्याप्रमाणें ईश्वराच्या पदस्पर्शाचा लाभ एकदां ज्याला मिळाला, त्याला या जगाच्या क्रीडाभूमीवर कशाचें भय नाहीं. या संसारांतील काळजी व त्रास इत्यादि उपाधींपासून तो मुक्त होतो आणि त्याला कोणतीही गोष्ट बद्ध करूं शकत नाहीं.

अनुवादक आणि संग्राहक
**श्रीराम बाळ सराफ,**
मुंबई.

[ अपूर्ण ]

# अनुभव

—श्रीगणेश—

१

पी. आर. जोशी
२७९ शनिवार पेठ,
ओक यांचा वाडा, पुणें.

श्री. रा. डॉ. गव्हाणकर यांना स. न. वि. वि.

आपणाकडून श्रीसाईलीला मासिकाचा (जानेवारी, फेब्रुवारी, मार्च) चा अंक मिळाला. त्याबद्दलचें कार्ड पोंचलें असेलच. त्यानंतर आतां निघणाऱ्या अंकांत खालील श्रीसाईकृपेनें मीं लिहिलेलीं (रचलेलीं) पदें छापावीं अशी विनंति आहे. काव्याच्या नियमांचें उल्लंघन झालें असणें शक्य आहे. परंतु श्रीसाईच्या केवळ प्रेमाचा अंकुर, निःसिम भक्ती हेंच त्यांतील मूळ आहे. कळावे. बाकी आम्हां उभयतांच्या व चि. रघुनाथ याची तब्येती उत्तम आहे. आम्हां सर्वांचा श्रीचे चरणीं व आपले चरणीं सप्रेम प्रणाम.

आपला,

(सही) **पी. आर. जोशी**

(चालः—मानापमान नाटकांतील, 'प्रेम सेवा शरण सहज')

**प्रेमपूजा करित मी सुमन वाहुं तुला ॥**
**दैन्यचिंता जाळूनी ठेवि तव पदीं मला ॥ ध्रृ० ॥**
**शुद्धनिष्ठासनीं, बैसवूनी तुला ॥**
**भक्तिनैवेद्य हा, सेवुनी कर कृपा ॥ प्रेमपूजा० ॥ १ ॥**

(**पद २ रें**, चाल, गवळण-हिंदी)

**दर्शन, न दिये तो मै कैसे घर जाऊं । मै कैसे घर जाऊं ॥ध्रृ०॥**
**बहोतो दिनो की तमन्ना (इच्छा) हमारी थी ॥**
**इसीलिये आये मै तेरे दरबारकू ॥ दर्शन, न,० ॥ १ ॥**
**मन बरतन, है खाली हमारा ॥ उसीके भरेदो साईप्रेम**
**सुधाकू ॥ दर्शन न दिये० ॥ २ ॥**

(**पद ३ रें**, भिमपलास, 'भूषण संसारा विमला ॥' चालीवर)

**सुखवील सहवासा ॥ साईच्या । स्थिरता येऊनी**
**चिरशांतिला ॥ सुखवील सहवासा ॥ ध्रृ० ॥**
**अनुभव नसता बोल फुकाचा, भक्ती भाव मनीं**
**ठेवा दृढ हा ॥ सुखवील सहवासा० ॥ १ ॥**

[ **पद ४ थें.** भैरवी, **चाल**—शाम मोहन प्यारे तुम ]

**शरण शरण तुमको साई। तुमबीन, ना कोई भाई ॥ धृ० ॥**
**लाखो जनम् ( जन्म ) घूम रहे ॥**
**बहुत परेशान बने अब तुमतो मुजकु मिले ॥**
**ना छोडो छोडो साई ॥ १ ॥ शरणं शरणं – ॥**
**श्री सच्चिदानंद श्री साई विजयते।**

## २

माझें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांत वेंगुर्ल्यानजीक रेडी म्हणून आहे. माझें लग्न होऊन जवळ जवळ ३० वर्षें झालीं पण अद्यापपावेतों मूल होण्याचें चिन्ह दिसलें नाहीं. आमच्यापरी आम्हीं डॉक्टर, वैद्य, हकीम, उतारे, तापारे, अंगारे, धुपारे, देवचार वगैरे वगैरे सर्वांकडे जाऊन पैशांची, शरीराची, मनाची, विल्हेवाट लावली; पण मुलाचें चिन्ह दिसेना. देवीला, देवाला, खंडोबाला, म्हसोबाला आमच्या कोत्या बुद्धीप्रमाणें नवससायास केले; पण कोणताही देव नवसास पावेना. शेवटीं मी व आमची मंडळी हताश झालों. मुलाकरतां मीं दुसरें लग्न करावें असें माझ्या बायकोपासून तों सर्व आप्त लोकांचें मत झालें व त्याप्रमाणें विचार करून चांगल्या घराण्यांतली मुलगी बघावी असें ठरलें. तोंच सरकारचा द्विभार्या कायदा लागू झाला. तेव्हां आम्हीं सर्व गर्भगळीत झालों. याच सुमारास आमच्या गांवीं रेडी मुक्कामीं एक 'साईभक्त' आले व आमच्या बंधूंच्या मनावर त्यांच्या प्रवचनाचा अर्थात् साईसंबंधीं केलेल्या उल्लेखांचा परिणाम झाला व त्यांनीं मला त्या भक्ताचा मुंबईतला पत्ता दिला व त्यांस भेटण्यास सांगितलें; त्याप्रमाणें त्यांना मी भेटलों. त्यांनीं मला गुरुचरित्रांतला दाखला देऊन त्यांनीं मला संतांचा अधिकार व संतांच्या वाणीचा प्रताप देवापेक्षांही किती जास्त आहे तें सिद्ध करून दिलें. "अशाच तऱ्हेची एक महान् सिद्धसंत विभूति शिरडी येथें झाली व त्यांची समाधी शिरडी येथें आहे. जरी ते नयनगोचर नसले तरी त्यांचा प्रताप व प्रभाव अद्याप दिसून येत आहे. ते संत म्हणजे श्रीसद्‌गुरु साईनाथ महाराज होय." इतकें सांगून त्यांनीं आम्हांस त्यांचा एक फोटो दिला व त्यांची सेवा तुम्हीं मनोभावें करा, मग कार्य होईल असें सांगितलें. त्यांच्या भाषणाचा आमच्या उभयतांच्या मनावर फारच परिणाम झाला व त्या दिवसापासून श्रीसाईंची मनोभावें पूजा करूं लागलों. आणि सांगण्यास अभिमान वाटतों कीं, सेवा करण्यास लागल्यापासून आमच्या पोटीं कन्यारत्न प्राप्त झालें. त्यामुळें घरांतलि लहान मुलाचा सोहळा व आनंद आम्हीं मनमुराद उपभोगूं लागलों. संतांची लीला अगाध आहे. देवाची कितीही सेवा केली, दानधर्म केला तरी जोंपर्यंत संतकृपा झाली नाहीं तोंपर्यंत सर्व व्यर्थ आहे. म्हणूनच म्हटलें आहे कीः—

**सद्गुरुवांचून। सांपडेना सोय ॥** हें सत्य आहे. ज्याला पारमार्थिक, प्रापंचिक, मानसिक व शारीरिक सुख पाहिजे असेल त्यानें श्री साईस शरण जावें व त्यांची सेवा

करावी. मग त्याला जें कांहीं पाहिजे असेल तें प्राप्त होणें अशक्य नाहीं. इतकें सांगून आपण सर्वजण त्या परमात्मा श्री साईस शरण जाऊं या.

आपला,
**भगवान गोविंद राणे,**
प्रभादेवी, मुंबई.

## ३

मुंबई
ता. १४–६–१९५०

संपादक महाशय,
श्री साईलीला त्रैमासिक, यांस—
सप्रेम नमस्कार वि. वि.

पत्रास कारण कीं, मी खालीं माझा, नुकताच आलेला अनुभव पाठवीत आहे तो योग्य वाटल्यास छापा; पण नांव मात्र प्रसिद्ध करूं नये हीच विनंति.

मी एक सरकारी नोकर आहें. माझ्याकडे कामें सुद्धां फार महत्त्वाचीं आहेत. मी खरोखरच सचोटीनें (आत्मप्रौढी नाहीं) काम करीत असतांही माझ्यावर एक अरिष्ट आलें. मी देवाचा–साईचा–भक्त असल्यानें व गुरुपदेश घेतला असल्यामुळें वाईट–साईट खात नाहीं. मला माझ्या खात्यांत शत्रू निर्माण झाले व त्यांनीं माझ्यावर भयंकर तऱ्हेचें संकट आणलें. सरकारच्या दारूबंदी योजनेमुळें सरकारी माणसांनीं दारू पिऊं नये असा नियम झाला व त्याचा भंग झाल्यास त्याला काढून टाकण्याचें ठरलें. या नियमाचा फायदा घेऊन मी दारू प्यायलों असा आरोप करून सरकारला कळविलें गेलें व सरकारी नियमाप्रमाणें मला कामावरून बडतर्फ करण्यांत आलें. मी सत्याला व साईला स्मरून व श्री साईंना सांगून माझा अर्ज (अपिल) वरिष्ठांकडे केला. खरोखरीच वरिष्ठांनीं माझ्या केसमध्यें जातीनें लक्ष घालून माझ्यावरचा आरोप खोटा आहे हें सिद्ध करून मला परत कामावर घेतलें. या बाबतींत माझ्या हांकेला श्री साई–सत्यविनाशकच धांवून आला व वरिष्ठांच्या मनांत माझ्याविषयीं प्रेम उत्पन्न करून अशा या आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धां माझ्या या केसमध्यें लक्ष पुरविण्याची प्रेरणा केली त्याबद्दल त्या दयाघन परमेश्वराचे–श्रीसाईचे–किती आभार मानूं?

आपला,
'सू'.

## ४

श्री. रा. रा. गव्हाणकर,
संपादक, श्रीसाईलीला यांसी—
सा. न. वि. वि.

मासिकांत लेख पाठविण्याची पहिलीच खेप असल्यानें ज्या चुका असतील त्या सुधारून घेऊन साईलीला त्रैमासिकांत, योग्य वाटल्यास स्थान द्यावें अशी विनंती आहे. आपणांस माहिती असेलच कीं, श्रीसद्गुरु साईनाथ महाराज यांच्या भक्तश्रेष्ठ व प्रसिद्धी-

विन्मुख कैलासवासी बाळासाहेब देवांच्या पितृदेव–कृपाछत्रांत वावरण्याचें, पर्यायानें श्रीसाईनाथ महाराजांच्याच सहवासाचें श्रेय लाभल्यामुळें, त्यांच्याविषयीं मनामध्यें भक्ती रुजल्यामुळें–त्याचें पर्यवसान 'अनुभवांत' होऊं लागलें व अलिकडे आलेला ताजा अनुभव–इतरांना माहिती व्हावा म्हणून, माझ्या प्रसिद्धीकरतां नव्हे—पाठवीत आहें त्याचा स्वीकार व्हावा. कामाच्या सवडीनुसार, जसा वेळ मिळत जाईल तसे–इतर अनुभव पाठवीन. कळावें.

श्रीनिवास बा. देव
मु. पो. राजूर, ता. अकोला,
जिल्हा–अहमदनगर.

'मद्वचनीं विश्वासुनी जे सेवा करिती ॥
'त्यांची चिंता लागे, रात्रंदिन मजसी॥'
अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमो वहाम्यहम्॥
श्री. भ. गी. अ. ९ श्लोक २२.

मार्च १९४८ पासून माझी राजूर येथें, एस्. एम्. पी. म्हणून सिव्हिल सर्जन व लोकलबोर्डातर्फे नेमणूक झाली. तत्पूर्वी ठाण्यासच खाजगी दवाखाना व न्यू एरोड्रोम सांताक्रूझ व जुहू एरोड्रोमवर चार वर्षेपर्यंत पार्टटाईम अशी युद्धकालांत, तात्पुरती नेमणूक झाली होती; तूर्त राजूर–दवाखाना इन् चार्ज म्हणून काम करीत आहे. जनता-जनार्दनाची निष्काम सेवा करण्याचें कैलासवासी पितृदेवांचें व्रत–अल्पांशानें का होईना सतत आचरण्याचा प्रयत्न चालू ठेवावा ही मनांतली इच्छा व सुदैवानें, धंद्याच्या निमित्तानें प्रसंग वारंवार येत असतातच. अस्तु.

येथें नोहेंबर १९४९ मध्यें प्लेगची सांथ उद्भवण्याचा फार संभव होता. कारण उंदरांच्या मरणाचें प्रमाण वाढतच होतें. वैद्यकीय नात्यानें मजवरच जबाबदारी असल्यानें व वेळींच प्रतिबंधक लस टोंचणें व सायनो गॅसनीं घरें स्वच्छ करवून घेतल्यामुळें एकही केस लागण न होतां, सांथ गांवांत पसरली नाहीं. तिचा उपद्रव कमी होतो न होतो तोंच देवीची सांथ गांवांत सुरू झाली. त्या सांथीचा बंदोबस्त करण्याकरतां व्हॅक्सिनेटरनां कळविलें; व ते दि. २–१–५० ला आले. त्या दिवशीं सोमवार होता व त्या गांवचा बाजाराचा दिवस. दवाखान्यांत पुष्कळच गर्दी, तरी वेळ काढून काम किती झालें म्हणून पहावयास, चि. माधवासह चावडीवर गेलों–परंतु लस संपल्यामुळें, ते परत गेले होते व पुनरपी ४ दिवसांनीं येणार होते. म्हणून तसाच परत दवाखान्यांत येऊं लागलों. येत असतांनाच आम्हीं पूर्वी ज्याचें दूध घेत होतों पण कांहीं कारणानें त्यानें दूध घालण्याचें बंद केलें होतें. (अर्थात् दुसरीकडील रतीब चालू होताच) तो, गणू चौधुले तेली याच्या मुलानें मजला हटकलें व म्हणाला, "डॉक्टरसाहेब आतां आमचेकडे नवीन म्हैस घेतली आहे, व जुनी पण व्यायली आहे. तेव्हां दूध उत्तम व पुष्कळ आहे, तेव्हां दुधाचा रतीब पुन्हां सुरू करा." श्री

नुसतें 'बरें आहे,' म्हटलें व नंतर त्याप्रमाणें कळवीन असें सांगून दवाखान्यांत घरीं आलों व सौ. कमलाबाईजवळ गोष्ट सांगितली कीं, आपला जुना दूधवाला परत रतीब सुरू करा म्हणून सांगत होता. पण दोघांचा विचार असाच झाला कीं, चालू असलेला दुधाचा रतीब बंद करून ह्याचें दूध चालू करणें बरें नव्हे, तेव्हां सध्यां स्वस्थच बसावें. पण या घटनेचा हेतू, त्या वेळेस तरी आमच्या लक्षांत येणें शक्य नव्हतें. लगेच दुसऱ्या दिवशीं दि. ३-१-१९५० ला नेहमींच्या दुधवाल्याची (भाऊ गंगाराम तेली) बायको-सखूबाई दूध घालावयास आली. दूध घातलें व म्हणाली-"डॉक्टरसाहेब, आम्हीं आमची म्हैस विकली, तेव्हां आम्हांला दुधाचा रतीब चालू ठेवणें परवडणार नाहीं. तेव्हां दुधाची सोय दुसरीकडे करावयास पाहिजे." तिचें भाषण ऐकल्यानंतर मात्र डोक्यांत प्रकाश पडला व ही सर्व बाबांची करणी आहे असें ध्यानीं आलें. कारण त्या गांवांत ऐनवेळीं दूध मिळणें दुरापास्तच व मुलाबाळांचे दुधावांचून फार हाल झाले असते, पण हांपावेतों, श्रीसाईनाथ महाराजांची कृपा व कैलासवासी पितृदेव व मातृदेव व विद्यमान पुण्याई सतत अहोरात्र सावलीप्रमाणें पाठिशीं-संरक्षण करण्यास सदैव तयार आहेच आहे, हा दृढविश्वास हृदयांमध्यें वसत असल्यामुळें इहलोकांतील व्यावहारिक अडचणीं व संकटें, क्षणकालपर्यंत उत्पन्न होतात व लयास पण जातात.

पुढें होणारी घटना-अंतर्ज्ञानानें जाणून, त्याबाबत जरूर तो बंदोबस्त करून ठेवणें, उद्यांला दूध बंद होणार तर दुसऱ्याला दूध चालू करण्याविषयीं त्याचे मनांत प्रेरणा करून वदविणें व क्षुल्लक वाटणारें संकट निवारणें-ह्या सर्व घटना सहजासहजीं घडल्या नसून, श्रीसाईनाथ माऊलीच्या प्रेरणेनेंच मुद्दाम घडल्या आहेत असेंच म्हणावें लागतें, व त्या दयाघन माऊलीच्या लीलेचें कौतुक जितकें करावें तितकें थोडेंच ! एवढ्या क्षुल्लक वाटणाऱ्या प्रसंगींसुद्धां जर ती माऊली मदत करावयास तयार असते, तर एखाद्या भक्तावर संकटांचे डोंगर जरी कोसळले तरी मदत करावयास, व संकटनाशार्थ तत्पर असतेच असते हें निसंशय व निर्विवाद होय.

अतएव वर निर्दिष्ट केलेल्या श्लोकांची सत्यता आरतीमधील वर्णन व श्रीकृष्ण भगवानांनीं नवव्या अध्यायांत बाविसाव्या श्लोकांत जें "आश्वासन" शिष्योत्तम श्री अर्जुन व अखिल भक्तांना दिलें "जो माझी , माझ्या ठिकाणीं पूर्ण श्रद्धा ठेवून अविरत एकनिष्ठेनें सेवा करतो, त्याच्या संसाराचीच काय पण सर्व जबाबदारी मजवर आहे व ती मी जातीनें पार पाडतों ह्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवा" तोच उपदेश व तेंच आश्वासन, श्री साईबाबा करीत होते व अनुभवाची प्रचीति पण निरंतर देत होते, व आहेत. तेव्हां वरील अनुभव, श्रीकृष्णरूपी श्री साईनाथ महाराज यांच्या लीलेसच व तदनुसार लोकद्वयामधून केलेल्या उपदेशरूपी आश्वासनास दुजोरा देऊन सत्यता पटवीत नाहीं का ?

आपला नम्र,
डॉ. श्रीनिवास बाळकृष्ण देव,
राजूर.

वरील अनुभवाप्रमाणेंच खालील " मंगलाष्टकें " श्रीसाईप्रभूवर रचिलीं आहेत. विवाह वा मौंजी अशा शुभप्रसंगीं म्हणण्यास कोणासही हरकत नाहीं, असें वाटल्यावरून आपणांकडे पाठवीत आहें. योग्य वाटल्यास मासिकांत स्थान द्यावें.

(शार्दूलविक्रीडत)

—ःमंगलाष्टकेंः—

भालीं चंद्र, तशी जन्हु-तनया
विलसे शिरीं सर्वदा ॥ १ ॥
उद्धारणें करुनी, जगीं सुरगृहा—
वाराणशी मोक्षदा ॥ २ ॥
राव रंक न भेद मानुनी जरा—
मांगल्य देई सदा ॥ ३ ॥
येवोनी तूं उमा-महेश-तनया
लंबोदरा संपदा ॥ ४ ॥
श्रीसाई कमलापती स्वरूपची
संदेह मानूं नको ॥ ५ ॥
नाथांच्या चरणांबुजीं रत सदा
कष्टासि घेऊं नको ॥ ६ ॥
नामासी मुखी ठेवुनी स्मर दुजा
थाऱ्यासि देऊं नको ॥ ७ ॥
कमला श्रीनिवास विनवी तुम्हां
तो साई सोडूं नको ॥ ८ ॥

"भाऊराया श्रीसाईनाथांच्या नामासी मुखी ठेवुनी स्मर व तो साई सोडूं नको."

आपला नम्र,
डॉ. श्रीनिवास बाळकृष्ण देव,
राजूर.

---

Shri Sai Baba Bhakta Samaj
120/B. Rash Behari Avenue
Dated 18 th April 1950

The Editor
Sai Leela
Shirdi

Dear Sir,

I have the pleasure to send you some Calcutta news for publication.

Yours faithfully,
(Sd) **P. S. V. Aiyar**
Hon. Secretary

## Calcutta News

On Monday the 27th March 1950 the Calcutta Sai Baba Bhakta Samaj Celebrated Shri Sai Ramanavami by offering Sahasranama Archana to Sai Baba and Ashtothram to Sai Ramachandra and offering a special feeding of the poor. The expenses in feeding the poor were incurred by Messrs. G. V. Raman and some local devotees. In the evening special Saipoojah was offered by the Bangiya Satguru Sai Sammelan at 1/24, Prince Ghulam Mohmed Road, Calcutta. Copies of the 9th number of Sai Prasanga were distributed along with Udi and Prasad on the occasion.

On Friday the 7th instant, on the occasion of Sita Kalyanam, the Samaj organised a sumptuous feast to three hundred of the East Bengal evacuees at the South India Bhajan Samaj Pandal, at the request and expenses of the above Samaj. Srijut Khagendranath Mukherji, Superintendent of Police, Government of India, Intelligence Bureau, Ministry of Home Affairs, addressed the evacuees on the occasion, on the necessity of leading a religious life and invoking Heavenly aid at this critical hour.

---

१

## श्रीरामजन्माचें महत्व

सोळाव्या शतकाच्या सुमारास श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यांत समर्थ श्रीरामदास यांचा अवतार झाला.

श्रीरामदास स्वामी हे महारुद्र मारुतीरायाचें अवतार होत. लग्नाच्या बोहल्यावर 'सावधान' हा शब्द कानीं पडतांच त्यांना स्वयंसिद्ध ज्ञानाची कल्पना झाली व लग-

लीच वैषयिक संसारावर लाथ मारून घराबाहेर पडले. त्यांनीं 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्रयोदशी मंत्राचा १२ वर्षे जप केला. त्यांनीं ठिकठिकाणीं मठ स्थापन करून गांवोगांवीं मारुतीचीं देवळें बांधलीं व कीर्तनें आणि भजनें यांच्या द्वारें रामनामाचा महिमा शूद्रातिशूद्रापर्यंत नेऊन पोहोंचविला. खालच्या वर्गांत पूर्वी एकमेकांची भेट होतांच "जोहार"–जय हरी–या शब्दाचा अपभ्रंश म्हणण्याचा प्रघात होता, तो बदलून "राम राम" म्हणण्याचा प्रघात पाडून दिला.

कलियुगांत जप, तप, योगाला महत्त्व नसून ज्या योगें नामाचा प्रवाह अव्याहत चालू राहील अशा कीर्तन–भजनाला जास्त महत्त्व आहे.

**कृत जुग सब जोगी विज्ञानी ।**
**करि हरि ध्यान तरहीं भव प्रानी ॥**
**द्वापार करि रघु–पति–पद पूजा ।**
**नर भव तरहिं उपल न दूजा ॥**
**कलि जुग केवल हरि गुण गाहा ।**
**गांवत नर पावहि भव याहा ॥**
**कलिजुग जोग न जज्ञ न ज्ञाना ।**
**एक आधार राम–गुन गाना ॥**
**सब भरोस तजि जो भज रामहिं ।**
**प्रेमसमेत गाव गुनग्रामहिं ॥**
**सोइ भव तर कच्छु संसय नाहीं ।**
**नाम प्रताप प्रगट कलि माहीं ॥**
**कलिकर एक पुनीत प्रतापा ।**
**मानस पुन्य होइ नहिं पापा ॥**

**तुळसीदास–रामायण**

श्रीसमर्थांनीं रामनामाचें बीज पेरलें व त्याचा रोपा वाढविण्याकरितां समर्थांच्या अवतार समाप्तीनंतर कांहीं संत होऊन गेले. रामनामाचा वृक्ष वाढीस लागून त्याचीं मधुर रसाळ फळें दुर्बल मानवांना देण्याकरतां जवळ जवळ पावणे दोनशें वर्षांनीं शिरडी येथील श्री साईबाबा उदयास आले व त्याच सुमारास राममारुती कल्याणास प्रसिद्ध पावले.

श्री सद्‌गुरु साईबाबा यांचा जन्म, तारीख, आईबाप अगर गांव यांचा पत्ता अद्यापपर्यंत लागत नाहीं. हे नायझाम स्टेटमधून शिरडीस आले. श्रीराममारुती यांचा जन्म मूळ नक्षत्रावर सोमवार शु०॥ ९ मी शके १७८१ मध्यें कुलाबा जिल्ह्यांत पेण गांवीं, देशपांडे यांच्या वंशांत झाला.

बाळपणापासूनच ह्यांना भजन, कीर्तन, पुराण यांची आवड व रंगांत आले म्हणजे मारुतीसारख्या उंच उड्या मारून भूः भूः कार करीत व नेहमीं विठोबा, रामारामा, मारुते रामराम म्हणत.

राममारुतीमध्यें विशेष बोध घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, तें चालू भाषेंत न बोलतां ईश्वरनाम भाषेंतच अध्यात्मिक अगर वाटेल त्या विषयावर चर्चा करीत, प्रश्नाचें उत्तर-सुद्धां ईश्वरी भाषेंतच देत.

शके १८३२ मध्यें राममारुतीमहाराज शिरडी येथें श्रीसाईबाबांना भेटण्यास गेले होते. त्यांच्याबरोबर कल्याणचे त्रिंबक आनंदराव कर्णिक म्हणून एक श्रीसाईबाबांचे निस्सीम भक्त होते.

श्रीराममारुतीच्या बाह्य वागणुकीवरून जरी ते मारुतीप्रमाणें भासत तरी ते नाथपंथीच असावेत.

शिरडी येथील साईबाबांस ते गुरुवत् पूज्य मानीत व ते आदिनाथ आहेत असें वारंवार म्हणत. स्वामी सद्‌गुरु बाळमुकुंद हे आमचे सद्‌गुरु खरे परंतु नाथपंथांतील आद्यगुरु श्रीसाईनाथ आम्हांस आदिनाथांच्या ठिकाणीं आहेत व स्वतः भुजंगनाथ आहोंत.

शके १८३२ मध्यें राममारुती महाराज शिरडीस गेले त्या वेळेस शिरडींत स्वतः श्रीसाईबाबांनीं "अरे, उद्यां माझा सोन्याचा दिवस आहे रे. अरे उद्यां माझी दिवाळी आहे." असें म्हणण्याचा सारखा सपाटा लावला होता.

बाबांची आरती सुरू झाली व श्रीराम मारुती बाबांच्या दर्शनास गेले तों बाबांनीं त्यांना घट्ट मिठी मारली व अशा रीतीनें कडकडून भेटल्यानंतर आपल्या अर्ध्यासनावर बसवून आरतीस प्रारंभ करण्यास सांगितलें.

महाराजांनीं बाबांकरतां शिऱ्याचा नैवेद्य तयार करविला परंतु पाकसिद्धीस उशीर झाला. नित्याप्रमाणें भक्तांचीं ताटें ( नैवेद्याचीं ) मशिदींत आलीं व अर्पण करण्यास प्रारंभ करणार तोंच बाबा म्हणाले, " थांबा, अगोदर माझ्या राममारुतीचा नैवेद येऊं द्या. मग सर्व नैवेद्य दाखवा."

महाराज शिरडीला चौदा दिवस होते व स्वतः बाबा त्यांना आपल्याबरोबर ठेवीत, प्रेमानें हंसत व त्यांच्याशीं गुजगोष्टी करीत.

महाराजांबरोबरच कल्याणचे रा. रा. त्र्यंबक अनंतराव कर्णिक गेले होते. बाबांनीं त्यांना " ईशावास्योपनिषदाचें त्रिकाल पठण करीत असावें व त्याचेंच श्रवण, मनन, निदिध्यास चालू ठेवावा " असें सांगितलें.

शके १८४० मध्यें श्री. कर्णिक महाराजांचे दर्शनास आले त्या वेळेस महाराजांनीं "ईशावास्योपनिषद् वाचतां काय ?" असा प्रश्न केला. " उपक्रम चालू आहे, परंतु मननाकरितां त्याचें समश्लोकी वृत्तांत रूपांतर करीत आहे " असें कर्णिकांनीं सांगितलें. नंतर महाराजांनीं समश्लोकी सुधारून त्यांच्या स्वाधीन केली. ( मराठी समश्लोकी )

महाराज ब्रह्मचारी व पूर्ण वैराग्यशील होते व त्यांनीं भजनमार्गें रामनामाचें महत्त्व, जनाच्या मनावर चांगलें बिंबवून दिलें.

श्रीसाईबाबांनीं शिरडी येथें मशिदींत रामनवमीचा उत्सव ( उरूस ) सुरू केला.

**रामनवमी प्रथम झाली। उरूसा पोटीं जन्मा आली ॥**

शके १८३३ मध्यें शिरडींत प्रथम रामनवमी झाली. त्या वेळपर्यंत रामनवमीच्या दिवशीं उरुस भरत असे. श्री साईबाबा श्री रामजयंतीचा उत्सव करीत असत. त्या उत्सवाची पद्धत, रामनवमीचे दिवशीं, श्री साईबाबा स्वतः मशीद धूत असत. दुपारीं १२ चे सुमाराला थोडें तेल आणून दिवे लावीत. व पैसा अधेल्यांचा गुलाल आणून धूनीवर, आपल्या डोक्यावर, मशिदीचे तीन पणत्यावर, कोपऱ्यांत, कमानींत उधळीत. श्री साईबाबा हे रामभक्त होते याचें कारण, एकदां मेहेरबान नामजोशी साहेब ऑ. कलेक्टर यांचे पुढें त्यांची शिरडीस साक्ष झाली. त्या साक्षींत 'मी कबीर' आहे असें सांगितलें.

एके दिवशीं कृष्ण जागेश्वर भीष्म हे वाड्यांत विचार करीत बसले होते. उद्यां रामनवमी आहे व उरुस भरणार, जर आपण रामनवमीचा उत्सव सुरू केला तर फार चांगलें होईल. इतक्यांत तेथें काकासाहेब दीक्षित आले. त्यांना त्यांनीं आपला विचार कळविला. काकांनासुद्धां तें ऐकून फार आनंद झाला, पण या खेडेगांवांत रामजन्माचें कीर्तन करणारे हरदास कोण भेटणार? लगेच भीष्म म्हणाले, मी कीर्तनकार होतों, तुम्हीं पेटीचा सूर धरा व राधाकृष्णामाई सुंठवडा तयार करतील. सर्व तयारी झाल्यावर काका म्हणाले, 'तर मग मशिदींत चला, आपण बाबांचा विचार घेऊन आरंभ करूं.'

काका व भीष्म मशिदींत आले, तों बाबांनींच काकांना प्रश्न विचारला, कीं 'काय काका, वाड्यांत काय चाललें होतें?' काका तो प्रश्न ऐकून भांबावून गेले व उद्दिष्ट विसरले. काकांची ही स्थिति पाहून तोंच प्रश्न बाबांनीं भीष्मांस विचारला—'कां, बुवा काय म्हणतात?' त्याबरोबर काकांना आठवण झाली व म्हणाले, 'बाबा, उद्यां रामनवमी आहे तरी रामजन्म उत्सव करण्याची आमची इच्छा आहे' बाबांनीं तें मान्य केलें.

दुसरे दिवशीं बाबा लेंडीवर गेल्याबरोबर इकडे मशिदीच्या मंडपांत पाळणा बांधला व कीर्तनाचा थाट मांडला. लेंडीवरून बाबा आले तर मशिदीसमोरील सभामंडप श्रोत्यांनीं फुलून गेला होता. भीष्म उठले व काका पेटीवर जाऊन बसले. आतां कीर्तनास सुरवात करणार तोंच बाबांनीं काकांस बोलाविलें. तोंच काकांच्या पोटांत धस्स झालें. काय होतें कोण जाणें! पण कथेचा विसर न होवो म्हणजे झालें अशा क्षुब्ध मनःस्थितींत मंद मंद पावलें टाकीत व घाबरत घाबरत वरती मशिदींत चढले तोंच बाबांनीं विचारलें कीं, "हा पाळणा येथें कशाला बांधला?" काका म्हणाले, "आज 'रामजन्म' उत्सव आहे." बाबांना तें ऐकून आनंद झाला व जवळ 'निंबराला' घातलेल्या हारांतून एक हार काढून काकांच्या गळ्यांत घातला व दुसरा कीर्तनकार भीष्म यांचेकरितां दिला.

भीष्मांनीं बहुश्रुत रसभरीत कीर्तन केलें व बाबासुद्धां कीर्तनांत दंग झाले व कीर्तनांत रामजन्माचे भजनाच्या थाटांत रामजन्म झाला. गुलाल सर्वत्र उधळला गेला. तोंच बाबांनीं नरसिंह रूप धारण केलें. डोळे गुलालासारखे लालभडक झाले. मोठमोठ्यानें अद्वातद्वां बोलूं लागले व इकडे तिकडे धांवूं लागले. राधाकृष्णामाई व इतर सर्व मंडळी घाबरली आणि लवकर पाळणा सोडा नाहीं तर पाळण्याचे तुकडे होतील म्हणून काकांच्या पाठीं लकडा लावला. काका पाळणा सोडण्यास पुढें धांवले तों बाबा अति कोपले व काकांच्या अंगावर धांवून गेले.

दुपारीं बाबा शांत झाले व म्हणाले, "अरे, आतांच कसा पाळणा सोडतां? जोंपर्यंत दुसरा दिवस लागला नाहीं व गोपाळकाला झाला नाहीं तोंपर्यंत उत्सवाची सांगता झाली नाहीं."

याप्रमाणें दुसरे दिवशीं गोपाळकाल्याचें कीर्तन झालें आणि मग पाळणा सोडण्यास बाबांनीं आज्ञा दिली.

समर्थ रामदास, राममारुती महाराज व श्रीसाईबाबा यांनीं रामनामाचा डंका सर्वत्र पसरला. कां तर, कलियुगांत "नामसंकीर्तन साधन पैं सोपें" आहे. आणि त्यांतल्या त्यांत 'राम' नाम फारच सोपें आहे. शिव हा अति त्यागी आहे व श्रीकृष्ण अति भोगी त्यामुळें यांचा आदर्श लोकांपुढें न ठेवतां फक्त एकवचनी, एकबाणी व एकपत्नी रामाचाच, कलियुगांत योग्य असें 'रामनामच' रामबाण आहे हें जाणून रामनामाचा प्रसार या त्रयीनें केला.

रामजन्म नवमीला होतो आणि प्रत्येक रामनवमीला शिरडीं येथें हा रामनवमीचा उरूस मोठ्या प्रमाणांत भरत असतो. हा उरूस श्रीसाईबाबांनीं स्वतःच चालू केला, पण तो कसा तर, रामनवमीचें खरें तत्त्व अनुभवानें पटवून दिलें.

रामजन्म नवमीला होतो आणि ह्या साडेतीन हातांच्या देहांतसुद्धां त्या रामाचा (आत्मारामाचा; आत्मज्ञान) जन्म नवमीलाच होतो. चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून रामाच्या देवळांत राम आख्यानावर कीर्तनें सुरू होतात व नवमीला रामजन्म करतात. तसेंच 'श्रवण, कीर्तन वगैरे नवविधा भक्ति करून नववी 'आत्मनिवेदन भक्ति' साधली म्हणजे रामजन्म झाला. शिरडींत रामनवमीचा उगम उरुसांतून झाला. राम याचा अर्थ आनंद व अतिशय आनंद झाला म्हणजे आपला 'उर (छाती) भरून येतो' व 'उर भरून आले' इ. शब्दप्रयोग त्याचे निदर्शक म्हणून वापरतों! तसेंच 'उरूस'= उत्कटतेचा निदर्शक आहे. उरुसांत लोक उत्कटतेनें भाग घेतात. मग इथें उत्कटता कोणाची तर, 'तीव्र मुमुक्षा!' ज्या वेळेस भक्ताला तीव्र मुमुक्षा होईल तेव्हांच तो आत्मनिवेदन करील, आणि एकदां कां आत्मनिवेदन झालें—रामनवमी—मग तो स्वात्मानुभवांत निमग्न असतो ही भक्तीची परमावधी-ब्राह्मी स्थिति प्राप्त होण्यास निष्ठा आणि सबुरी अत्यंत आवश्यक आहे.

भीष्म वाड्यांत सबुरी धरून बसले होते तोंच काकासाहेब दीक्षित निष्ठायुक्त भक्तीच्या द्वारें आपला मार्ग चोखाळीत असतां, त्यांच्या निष्ठेला सबुरीनें चालना दिली

व तीव्र मुमुक्षा काकांना भासूं लागली. भक्तीची परमावधी होण्याचा काळ—आत्मज्ञान संपादन करून घेण्याचा काळ समीप आला. भक्तीची परमावधी कशानें कळते तर ‘सविकल्प–परोक्ष–ज्ञानानें’ आणि म्हणूनच तुकारामांनीं नाथभागवताचीं १००० पारायणें केलीं. कीर्तनांत हरिदास सविकल्प ज्ञान सांगतो, परंतु भोळी भक्ती—खेडेगांव—नुसतें मुखें नाम बोला एवढीच माहिती, मग अशा भोळ्याभाबड्या भक्तीला सविकल्प ज्ञान—कीर्तनकार कोण भेटणार? ज्या सबुरीच्या बळावर त्यानें आपली निष्ठा वाढवावी तीच सबुरी त्याला मार्ग दाखविते. कीर्तनकार सांगतो, तुम्हीं पेटीचा सूर धरा—दिनरात्र नामस्मरणाचा सूर चालू असला म्हणजे अनुहतध्वनि—ओळख पटते व वृत्ती स्थिर होऊन ‘सर्वांभूती सम’ होते! भीष्म कीर्तन करतात—भोळी भक्ति केली खरी पण तिची पूर्तता कशी होणार? भोळ्या भक्ताकरतां परमात्म्यानें सर्व कांहीं जय्यत तयारी करून ठेवली आहे. भक्ति दृढ झाली कीं त्याला गुरु शोधण्याची आस्था सुरू होते आणि मग सबुरीच्या जोरावरच ती (सबुरी) त्याला आंत गुरु शोधण्याला प्रवृत्त करते—एवढी तयारी झाल्याबरोबर, गुरुभेट होते—ते दोघे मशिदींत आले, बाबा भेटले.

ज्याप्रमाणें नवपरिणीत वधूची प्रथम भेटींत विमोहित अवस्था होते तशीच जिज्ञासु भक्तांची गुरुभेट झाली म्हणजे होते—जशी वधूला वाचा फुटत नाहीं, भांबावून मान खालीं घालून पायाच्या आंगठ्यानें चाळ करीत असते तद्वतच भक्ताला—शिष्याला वाचा फुटत नाहीं व तो स्तब्ध राहतो. मग गुरु आपल्या शिष्याची अवस्था पाहून लागलीच विचारतो, “कां बाळ, वाड्यांत काय चाललें होतें. कसला विचार चालला आहे?” गुरूच्या शोधक प्रश्नानें तर तो अधिकच गुदमरून जातो—त्याचे अष्टभाव प्रगट होतात. त्याच वेळेस गुरु, शिष्याला आपल्या हृदयाकडे घेतो, कारण गुरुविषयींचें प्रेम अष्टभावानें प्रगट होतें. काकांना कांहींसुद्धां सुचेना, पण गुरूला आपल्या शिष्याला आत्मबोध करून शहाणा करावयाचा असतो; तो शिष्याला बोलता करतो, आणि म्हणूनच बाबा भीष्माला विचारतात, ‘कां, बुवा काय म्हणतात?’ तोंच काकांना आठवण होते व ते बाबांना आपला उद्देश सांगतात—गुरु त्याला आत्मबोध करतो—पण आत्मानुभव देत नाहीं!

पाळणा कशाकरितां बांधला? पाळण्याचें काम काय, तर जन्मलेल्या बालकाला ठेवण्यासाठीं—निजविण्यासाठीं—मग ‘ना जनन ना मरण’ असा मुळांत नित्य अज्ञ असलेला परमात्मा जीवांशरूपानें जन्म घेतो, तेव्हां त्याचा पाळणा कोठला? तर देह—बाबांनीं, पाळणा बांधावा कशाला? अरे तूं कोण; कोठून आलास? करतो आहेस काय? आणि केलें पाहिजेस काय? हाच आत्मबोध केला. मग शिष्य म्हणतो, आत्मानुभव म्हणजे काय हें समजून घेण्याला व जीवनमुक्त होऊन पराभक्ति करण्याला कथा—कीर्तन करीत आहे. गुरूला पटलें कीं हा आतां आत्मानुभव चाखावयास योग्य झाला—एक हार काकांच्या गळ्यांत घातला—त्याला उपदेश देऊन अनुष्ठानास बसविलें. शिष्याला मंत्र उपदेशतात व जप माळ देऊन महावाक्याचा अनुभव देतात.

रामजन्म झाला, मग बाबांनीं नरसिंह अवतार कां धारण केला ?

शिष्याला आत्मबोध करून जपमाळ देऊन अनुष्ठानास बसविलें, अनुष्ठानांत त्याला आत्मसाक्षात्कार (राम–जन्म) होऊं लागला कीं तो गडबडतो; कारण तेथें ध्याता, ध्यान व ध्येय ही त्रिपुटी नष्ट होऊं पाहते–पाळण्याचे होतील तुकडे–जीव शीव द्वैत जाऊं पहाते. गुरु नरसिंह अवतार धारण करून काय म्हणतो तर मी तुला जीवानिशीं खाईन, तुझे जन्म मरणाचे फेरे (पाळणा) मोडून टाकीन, मी तुला माझ्यांत समरसून घेईन. राम–जन्म झाला–मी–तूं–पणा जाऊन तो गुरूशीं एक झाला. आतां खरें पाहिलें असतां त्याचा देह पडला पाहिजे–पाळणा सोडला पाहिजे. जर गुरूशीं त्याचा एकभाव–एकजीव झाला मग या देहाची उपाधी कशाला ? काका पाळणा सोडण्यास जातात तों बाबा अति कोपतात–गुरु त्याला देह सोडूं देत नाहीं, त्याला बोध करतो: बाळा, तूं माझ्यांत समरसलास खरा पण प्रारब्धानें जन्मलेल्या देहाला प्रारब्ध भोगूनच देह ठेवला पाहिजे, तेव्हां प्रारब्ध संपेपर्यंत तुला देह असणें प्राप्त आहे.

**नाहीं झाला गोपाळ काला । उत्सव सरला न म्हणावें ॥**

तुझें कार्य झालें खरें, तूं देही असून विदेही झालास. पण हा स्वार्थ तूं साधलास, तर पराभक्ति करून लोकांना सन्मार्ग दाखवून त्यांनाही मार्गाला लाव, तर उत्सव सार्थ ठरेल. नाहीं तर प्रत्येक साधक आपण जीवनमुक्त झालों एवढ्यावरच तृप्त राहील तर अज्ञ जनानां मार्ग कोण दाखविणार ? आणि ह्याकरितांच मी मुक्त असतां तुझा अभिलाष धरून तुला शिष्य केलें व ह्याच अर्थानें मुलगा झाल्याशिवाय निपुत्रिकाला–स्वर्ग नाहीं, म्हणून तूं लोकसंग्रह कर–गोपाळकाला कर व पाळणा–देह–सोड.

रामजन्म झाला. राधाकृष्णमाईनें सुंठवडा तयार करून वांटण्यांत आला. राधा=जीव, कृष्ण=शीव. सुंठवडा तयार करणें–जीवाशिवाचें ऐक्य–समदृष्टीरूप सुंठवड्याचा प्रसाद होय.

रामजन्माच्या उत्सवाचें खरें मर्म किंती जणाना कळलेलें असतें ? प्रभुरामचंद्रांनीं केवळ भक्तोद्धारार्थ अवतार घेऊन स्वतःच्या आचरणानें नरजन्माचें सार्थक कशा रीतीनें करावें, अगर नरजन्माचें काय कर्तव्य हें दाखवून दिलें. त्या रामजन्माचे आम्हीं मौजेखातर जर उत्सव करूं लागलों तर त्या रामचंद्रप्रभूला काय वाटेल? मुलाचा जन्म झाला कीं आनंदानें आपण महोत्सव ( बारसें ) करतों. जन्मोत्सवाचे ‘ घी ’ तेवढें पाहातों, पण त्यामागें जन्ममरणाचा ‘ बडगा ’ आहे त्याची जाणीव आहे काय ? बळें बळें आम्ही जीवाला बंधनांत पाडीत आहोंत हें पाहून बाबांना नरसिंह अवतार धारण करणें भाग पडलें. ज्या बाबांनीं केवळ आपल्या उद्धारार्थच देह घेतला त्यांना आपल्या या अशा वागण्याचा राग कां येऊं नये ?

प्रत्येक मनुष्य जन्मतःच तल्लख बुद्धीचा नसतो, बहुतेक जड बुद्धीचेच असतात. हा त्यांचा दोष नव्हे; जन्मोजन्मींच्या कर्मांचा आहे. तेव्हां त्यांची हेटाळणी करणें

योग्य नव्हे. त्यांना सुबुद्धीच्या लोकांनीं आपलेपणा दाखवून आपल्यांत समरस करून घेतलें पाहिजे, आणि म्हणूनच, जें मोठमोठ्या तत्त्वज्ञान्यांना अगर शास्त्रीपंडितांना करतां आलें नाहीं तें तुकाराम–ज्ञानेश्वरांनीं वारकरी संप्रदाय स्थापून केलें. त्यापूर्वी द्वापारयुगीं श्रीकृष्णानें गोपगोपींना एकत्र करून त्यांत समरस होऊन 'गोकुळींचा चोर' हें नांव सार्थ केलें, गोपाळकाला केला. अशा रीतीनें, आपण, आपले विचार व भावना सर्व कांहीं एक आहोंत. भेदा–भेद नाहींत. आपण सर्व त्या रामाचीं लेकरें आहोंत. सर्वजण एकाच रक्ताचे भाऊ भाऊ आहोंत हें जाणण्याकरतांच 'काला' केल्याविना उत्सवाची पूर्तता होत नाहीं असें बाबांनीं सांगितलें.

देह ही ईश्वराची आवडती पोथी. संतकृपेनें या पोथीचा बोध झाला कीं, जगांतल्या इतर पोथ्या आटोपल्या. ज्ञानोबा तुकोबांनीं तर देहाला आत्मलिंग श्री विठ्ठलाचा दशद्वारी मठ म्हटलें आहे. देह हीच विठूरायाची नगरी पंढरी. देह हाच देवाचा साक्षात्कार. देह म्हणजेच आत्मसोहळा. विश्वव्यापक प्रभूच्या निर्गुणपणाला लाभलेली सौभाग्यता तें हें शरीर.—

आत्माः–राम, देहः–सीतामाई. श्रीकृष्ण परब्रह्म खरा, पण साडे तीन हाताचा मानवी देह घेऊन आला–यादवाचा प्यार झाला–तेव्हां गोकुळांत सुखाचे मळे पिकले. हें स्पष्ट दाखविण्याकरतांच बाबांनीं रामजन्माची ही अशी सुरवात केली.

फुटबॉलमध्यें हवा भरली म्हणजे तो खेळण्यास युक्त होतो व खेळ खेळतांना आनंद होतो, पण त्याला एखादें छिद्र असलें म्हणजे आनंदाचा विरस होतो. पण हा देहरूपी फुटबॉल ज्यानें केला त्याला नऊ छिद्रें असतांनासुद्धां त्यांतील प्राणवायु रोखण्याची योजना करण्याची कृति किती अजब आहे. अशा अजब महालांत अवयवरूपि नोकर-वर्गासह मनरूपि राणी वावरत असते. याच राणीचे बंदोबस्ताकरतां अवांश्रित धर्मसंस्था व साधुसंतांचे अवतार व त्यांची शिकवणूक अस्तित्वांत आल्या आहेत. म्हणून प्रत्येक मानवानें संतसमागम करून आपली नरदेहाची इतिश्री करणें योग्य आहे.

**॥ जय राम श्री राम जय जय जय राम ॥**

संपादक

---

## ॥ मुक्तात्मा ॥

प्रत्येक मनुष्यप्राणी हा सुखाकरितां धडपडत असतो; पण खरें सुख कशांत आहे हें त्याला कळतच नाहीं. सुखाविषयींच्या आपल्या कल्पना मर्यादित आहेत म्हणून सुखासाठीं धडपडतांनासुद्धां आपण दुःखीच राहतों. सुख किंवा दुःख भोगणें या गोष्टी आपल्या पूर्वजन्मींच्या कर्मांवर अवलंबून असतात. पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचीं फळें आपणांस या जन्मीं भोगावीं लागतात आणि या जन्मींचीं फळें पुढच्या जन्मीं भोगणें प्राप्त आहे. कर्माकरतां जन्म व जन्माकरतां कर्म असें हें रहाटगाडगें चालू आहे. आपल्या हातून होणारें कर्म आपल्या इच्छेवर अवलंबून असतें. ज्यावेळीं कोणतीहि इच्छा रहाणार नाहीं त्यावेळीं आपण कोणतेंही कर्म करणार नाहीं, व कर्म संपल्यावर प्रत्येक प्राण्याचें इहलोकींचें कार्य संपलें व तो मुक्त झाला. मुक्त होण्याकरितां आत्म्याचीं सर्व बंधनें तोडलीं पाहिजेत. मुक्त होण्याची संधी प्रत्येक प्राणिमात्राला मनुष्यजन्मींच प्राप्त होते. आणि म्हणूनच पूर्वपुण्याइनें लाभलेल्या या नरदेहाचं आपण सार्थक केलें पाहिजे.

सुख म्हणजे निरंतर टिकणारा आनंद ! अर्थात् जो निरंतर आनंदी आहे तो खरा सुखी. ज्याला सर्व ठिकाणीं मंगल दिसत आहे तोच खरा सुखी ! असा मनुष्य दुःखाच्या अंधारांत कल्पनेचे दिवे घेऊन सुख शोधीत बसणार नाहीं, कारण त्याच्या हृदयांत सुखाचा प्रकाश पडलेला असतो. त्याच्या हृदयांत अव्याहत वहाणाऱ्या सुखाच्या झऱ्यामध्यें दुःखाचा पालापाचोळा साफ धुऊन निघतो. खरें सुख हृदयांत आहे. कोणत्याही बाह्य वस्तूपासून होणारें सुख विनाशी असतें. ती वस्तू दृष्टिआड झाली कीं, सुख नाहींसें झालें. म्हणून या क्षणिक सुखाला भुलून न जातां खरें निरंतर सुख प्राप्त करण्याचा प्रयत्न करणें चांगलें. असें अविनाशी सुख फक्त एकाच ठिकाणीं आढळतें आणि तें ठिकाण म्हणजे स्वतःचें हृदय—

**“ ज्या सुखासी नाहीं अंत । तें सुख आहे हृदयांत ॥ ”**

तेव्हां या हृदयांतील सुखाचा शोध करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. अर्थात् त्यासाठीं हृदयांत सुख कोणाला होतं हें पाहिलं पाहिजे. आपण म्हणतों कीं, ‘ मी सुखी आहें.’ समजा माझ्या हृदयांतून आवाज आला कीं, ‘ मी सुखी आहें ’ तर मग असा प्रश्न येतो कीं, मी म्हणजे कोण ? जर आपणाला खरें सुख अनुभवायचें असेल तर आपण आपल्या हृदयाचा शोध केला पाहिजे. त्या हृदयांत असणाऱ्या ‘ मी ’ चा शोध केला पाहिजे. ‘ मी कोण आहे ? ’ हा प्रश्न सुटल्यानंतर त्याचें सुख कशांत आहे तें कळेल. आणि मग सुखी होण्याचा मार्ग सांपडेल.

प्रत्येक मनुष्य स्वतःला मी या सर्वनामानें संबोधितो, परंतु ‘ मी म्हणजे कोण ? ’ हा प्रश्न केला तर त्याचें उत्तर लवकर सांपडत नाहीं. एखादें काम केल्यानंतर आपण

म्हणतों कीं, हें काम ' मीं ' केलें. माझ्या हातानें हें काम केलें असें आपण म्हणत नाहीं, म्हणजेच मी म्हणजे माझे हात नाहींत. त्याचप्रमाणें ' मी ' म्हणजे माझे पाय, कान, डोळे वगैरे कांहीं असूं शकणार नाहीं. मग ' मी ' म्हणजे का माझा देह ? आपण ' मी ' झोपलों असें म्हणतों, पण माझा देह झोंपला असें आपण म्हणत नाहीं. म्हणजे ' मी ' आणि ' माझा देह ' या गोष्टी भिन्न आहेत. जरी ' मी ' आणि माझा देह हे एकमेकांशीं निगडीत असले तरी ते दोन्ही एकच नाहींत. ' मी ' म्हणजे माझ्या बाह्य इंद्रियांपैकीं कांहीं एक नाहीं; तर ' मी ' कोण ?

आईबापांनीं मला जन्म दिला पण जन्मतःच ' टॅंह टॅंह ' करून रडायला कोणी शिकविलें ? वाढत्या आयुष्याबरोबर विचार करण्याची शक्ति ( Thinking power ) मला कोणी दिली ? आईबापांनीं खास नव्हे. तर ती एका अज्ञानांतून आपणच माझ्या देहांत प्रवेश करती झाली. या शक्तीला आपण ' आत्मा ' म्हणतों. आत्म्याचें अस्तित्व प्रत्येकास मान्य केलेंच पाहिजे. या आत्म्याचे जोरावरच आपण सर्व गोष्टी करतों. जसें एखादें एंजिन असतें, त्यांत जर वाफ नसेल तर तें चालूं शकणार नाहीं. सायकल चालवण्यास तिच्यांत हवा पाहिजे. मोटार चालविण्यास पेट्रोलची जरूरी लागते. त्याचप्रमाणें या आपल्या आईबापापासून प्राप्त झालेल्या देहास चालविण्यास आत्म्याची जरूरी लागते. आपला देह म्हणजे एक रथ आहे. मन हा त्याचा घोडा, आणि आत्मा हा त्या घोड्याला बुद्धिरूपी लगामाच्या सहाय्यानें धरून ठेवणारा सारथी. त्या रथाला वाटेल तिथें चालविणें आत्म्याच्या हातांत असतें. आत्मा हा सारथी नसेल तर देह–रथ चालविणार कोण ? हा आत्मा म्हणजेच " मी."

आतां हा आत्मा आला कोठून, हें पाहूं. आईबापांनीं माझा नुसता देह घडविला पण आत्मा कांहीं त्यांनीं मला दिला नाहीं. नाहींतर मी मेल्यानंतर– माझ्यांतील आत्मा निघून गेल्यानंतर–तो माझ्या देहांत त्यांना घालतां आला पाहिजे. पण असें होत नाहीं. मोटारचा आत्मा म्हणजे पेट्रोल. पेट्रोल संपल्या-नंतर मोटार चालत नाहीं. पण त्याच मोटारींत आणखी पेट्रोल घातल्यानंतर ती चालूं शकते. मनुष्यानेंच पेट्रोल उत्पन्न केलें आणि म्हणूनच तो बंद पडलेली मोटार पुन्हां चालूं करूं शकतो. पण मेलेला मनुष्य कांहीं जिवंत करूं शकत नाहीं, कारण तो देह चालविणारा आत्मा मनुष्यानें उत्पन्न केलेला नसतो. जर आई–बापांनीं आपल्या मुलाच्या शरीरांत आत्मा ओतला असता तर तो आत्मा त्या मुलाचा देह सोडून गेल्यानंतर आई–बापांना परत त्या देहांत घालतां आला पाहिजे. पण ही गोष्ट अशक्य आहे. अर्थात् आत्मा हा मानवनिर्मित नाहीं. हा आत्मा किंवा ' मी ' म्हणजेच ईश्वर. तो चराचर व्यापून राहिलेला आहे.

या आत्म्याच्या जोरावरच सृष्टीचे सर्व व्यापार चालतात. पाऊस पडणें, वारा वाहणें, भूकंप होणें वगैरे गोष्टी निसर्गक्रमानुसार होतात परंतु जर का या सृष्टीनियमांत

फरक झाला तर तो पूर्ववत् सुरळीत करणें मानवाच्या हातात आहे काय ? नाहीं. तर मग हा सृष्टीक्रम कशाच्या जोरावर चालतो ? तो एका चैतन्याच्या जोरावर चालतो व हें चैतन्य म्हणजेच "आत्मा". मानवानें कितीही शोध लावले, जरी तो पाणबुडीच्या सहाय्यानें समुद्राचा तळ गांठूं शकला किंवा विमानमार्गें आकाशांत उंच उंच भराऱ्या मारूं लागला तरी निसर्गावर त्याला विजय मिळवितां येईल काय ?

वारा, पाऊस हीं निसर्गाचीं बाळें होत. तीं जोंपर्यंत व्यवस्थित असतात तोंपर्यंत सर्व सुरळीत चालतें. आपण भर मध्यान्ही ओसाड मैदानांत दोन मैलांची रपेट करून विश्रांतीसाठीं एखाद्या झाडाखालीं बसलों आणि त्याचवेळीं जर वाऱ्याची एक गोड झुळूक आपल्याला स्पर्श करून गेली तर किती आल्हाद वाटतो ! पण जर का निसर्गाचीं बाळें खवळलीं तर आपली कोण त्रेधातिरपीट उडते बरं ! 'वारा, लोकांच्या घरादारावर व छपरांवर नगारे वाजवूं लागला, आणि त्या तालावर तांडवनृत्य करीत करीत गिरक्या घेत घेत त्याची बहीण विद्युल्लता पृथ्वीवर अवतरूं लागली व तिच्या आगमनाची वर्दी, तिचे भाऊ मेघ दुंदुभि वाजवून देऊं लागले कीं मानवाला ' 'दे माय धरणीं ठाय ' होऊन जातें. अशावेळीं निसर्गावर ताबा चालविणें मानवाला कधीं शक्य झालें आहे काय ? नाहीं, कारण हा सृष्टीक्रम एका चैतन्याच्या जोरावर चाललेला असतो आणि त्याच चैतन्यावर मानवाचें जीवित अवलंबून असतें. मग त्या निसर्गाविरुद्ध जाऊन मानवाचें कसें चालेल ?

सृष्टीमध्यें सर्वत्र चैतन्य भरलेलें आहे. चैतन्य म्हणजेच परमात्मा किंवा ईश्वर. हेंच चैतन्य आपल्या शरीरांत आहे म्हणूनच आपण जिवंत आहोंत. हें चैतन्य किंवा आत्मा एकदां शरीरांतून निघून गेलें कीं आपला देह निर्जीव झाला. मग पुन्हां त्याला सजीव करणें कोणालाही शक्य नाहीं. आपण जन्माला येतों तेव्हांच आपल्या शरीरांत हें चैतन्य असतें व मृत्युसमयीं तें शरीराबाहेर जातें. आतां असा प्रश्न येतो कीं, एखादा मनुष्य मृत्यु पावल्यानंतर त्याच्या देहांतील चैतन्य जातें कोठें ? याचें उत्तर येवढेंच कीं, हें चैतन्य नाहींसें होत नाहीं, तें एक देह सोडून दुसऱ्या देहांत शिरतें आणि याप्रमाणें पुनर्जन्म होतो.

पुनर्जन्म हा आपल्या पूर्वजन्मींच्या कर्मांप्रमाणें प्राप्त होत असतो. आपण कोणतीहि गोष्ट करतों तेव्हां त्या गोष्टीचा ठसा आपल्या मनावर उमटलेला असतो. समजा, लहानपणीं तुम्हीं आणि तुमचा मित्र असे अगदीं जिवलग दोस्त होता. पुढें तुमची ताटातूट झाली आणि नंतर ३०-४० वर्षांनंतर तुमची अचानक भेट झाली तर तुम्हीं एकमेकांस ओळखूं शकाल काय ? जेव्हां तुमच्या मनावर बाळपणीं उमटलेला मैत्रीचा ठसा जागृत होईल तेव्हां तुम्ही एकमेकांस ओळखाल. आपण एखादी वस्तु पाहून ती वस्तु अमूक अमूक आहे असें ओळखतों कारण तसलीच एक वस्तु आपण पूर्वी कधींतरी पाहिलेली असते आणि तिचा ठसा आपल्या मनावर उमटलेला असतो. तात्पर्य हेंच कीं, या जन्मीं पाहिलेला किंवा केलेल्या गोष्टींचा ठसा आपल्या मनावर उमटलेला असतो. मृत्यू पावल्यानंतर-आपल्या

देहांतून चैतन्य निघून गेल्यानंतर–आपलें मनसुद्धां आपल्या देहाबरोबर रहात नाहीं. आत्मा हा त्या देहाबरोबरच फिरत असतो आणि पूर्वजन्मींच्या कर्मांचा मनावर ज्या प्रकारचा ठसा उमटलेला असतो त्याप्रमाणें त्या कर्मांचीं फळें भोगण्यास लायक असलेल्या देहांत तो प्रवेश करतो. या जन्मीं पाप कर्म केलें तर पुढील जन्म वाईट येऊन दुःख भोगावें लागेल. या जन्मीं पुण्यकर्म केलें तर पुढील जन्म चांगला येऊन, विनाशी कां होईना, पण सुख मिळेल.

जन्माला येतांनाच आपला आत्मा हा बरोबर पूर्वजन्मींच्या कर्मांची शिदोरी घेऊन येतो. ती शिदोरी संपेपर्यंत आपणाला जीवन कंठणें भाग आहे. कोणाची शिदोरी चांगली पक्की असते, कोणाची कच्ची तर कोणाची अर्धकच्चीं असते; आणि त्या प्रमाणांत प्रत्येकाला सुख किंवा दुःख भोगावें लागतें. या जन्मीं आपण जशी शिदोरी बांधूं त्याप्रमाणें पुढील जन्म आपणाला मिळेल. म्हणून मी दुःखी आहें म्हणून झुरत बसण्यापेक्षां आहे त्यांत समाधान मानून या जन्मीं तरी आपली शिदोरी चांगली भक्कम करूं या. दुसरा सुखी आहे म्हणून त्याचा हेवा करण्याचें सोडून देऊं. खरा सुखी असा कोणी नाहींच. प्रत्येकजण आपापल्यापरी दुःखी आहेच. कोणाचें दुःख कमी तर कोणाचें जास्त, याबद्दल खेद करण्याचें कारण नाहीं. ‘ दुःखी, दुःखी ’ म्हणून दुःख करण्यांत अर्थ नाहीं. पूर्वजन्मीं आपण जी शिदोरी बांधली आहे ती आतां बदलतां येत नाहीं, पण या जन्मीं तरी ती नीट बांधणें आपल्या हातांत आहे ! दुसऱ्याच्या सुखाकडे पाहून आपलें दुःख आठवण्यापेक्षां आपल्यापेक्षां जे दुःखी आहेत त्यांची स्थिति लक्षांत घेऊन त्यांच्यापेक्षां आपण बरें आहोंत असें समजून समाधान मानूं या.

आपल्याला खरें सुख पाहिजे तर सध्यां आहे त्या स्थितींत समाधान मानून मी कोण तें ओळखण्याचा प्रयत्न करूं या. आपल्या कर्मांचीं फळें आपण भोगतों तसेंच दुसरेही त्यांच्या कर्मांचीं फळें भोगतात, हें नेहमीं लक्षांत ठेवून दुसऱ्यांच्या कल्याणाकरतां झटूं या. जसजशी आपली शिदोरी पक्की पक्की होत जाईल तसतसे आपण खऱ्या सुखाच्या मार्गावरून जात जात, सुखाच्या दरवाजाजवळ जाऊन पोहोंचूं. जसजसे आपण पुण्यकर्म करीत राहूं, जसजसे आपण इतरांच्या कल्याणासाठीं झटूं, तसतशा आपल्या स्वतःच्या इच्छा नष्ट होत जातील. ‘ मी ’ आणि ‘ माझें ’ हे दोन्ही शब्द आपल्या अंतःकरणांतून नाहींसे होत जातील, आणि अशा रीतीनें सुखाच्या दरवाजापर्यंत येऊन पोहोंचल्यानंतर ज्यावेळीं आपल्या सर्व इच्छा नाहींशा होतील त्यावेळीं योग्य मार्गदर्शक भेटून दरवाजा खुला होईल.

सुखाचा दरवाजा एकदम उघडल्यानंतर मग काय पाहिजे ? मग त्या सुखाचा उपभोग मनमुराद घेतां येईल. हृदयांत असलेला ‘ मी ’ कोण याचा बरोबर तपास लागल्यानंतर, ‘ मी ’ व ‘ माझें ’ हे दुःखाला कारणीभूत झालेले दोन शब्द हृदयांतून

नाहींसे झाल्यानंतर आपल्याला सर्व ठिकाणीं मंगल दिसेल, चिरंतन सुख प्राप्त होईल. तें चिरंतन अविनाशी सुख भोगण्याकरतां आत्म्याचीं बंधनें तुटलीं पाहिजेत. आत्म्याचीं बंधनें म्हणजे इच्छा, आकांक्षा, वासना! या इच्छा नाहींशा झाल्या पाहिजेत. इच्छा किंवा वासना नाहींशा होण्याकरतां नेहमीं इतरांच्या कल्याणासाठीं धडपडून स्वतःचें अस्तित्व विसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःचें अस्तित्व विसरण्यासाठीं स्वतः म्हणजे 'मी' कोण याचा शोध केला पाहिजे. हें सर्व झाल्यानंतर आत्म्याचीं बंधनें तुटतील आणि तो मुक्त होईल.

इच्छा नाहींशा झाल्या कीं कर्म संपलें, कर्म संपलें कीं जन्म नाहींसा झाला. जन्म नाहींसा झाल्यावर आत्मा जाणार कोठें? आत्मा मुक्त झाला; तो परमात्म्यांत, सर्व चराचर सृष्टी व्यापून राहिलेल्या चैतन्यांत विलीन झाला, आणि त्या आत्म्यानें धारण केलेला पूर्वीचा देह '**मुक्तात्मा**' झाला.

प्रमोद के. गव्हाणकर

# -: शिर्डीवृत्त :-

## माहे फेब्रुवारी १९५०

या महिन्यांत बाहेरगांवचे बरेच भक्त नेहमींप्रमाणें श्रीचे दर्शनास येऊन गेले.

**देणगी:**—या महिन्यांत एकूण १७ भक्तांकडून श्रीसाठीं निरनिराळ्या देणग्या ( वस्तू ) आल्या.

**धर्मकृत्य:**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे धर्मकृत्यें नेहमींप्रमाणें झालीं. तीन भक्तांनीं श्रीसत्यनारायणाच्या पूजा केल्या.

**कीर्तन:**—संस्थान गवई यांची या महिन्यांत माघ वद्य ९–श्रीदासनवमी व महाशिवरात्र अशीं दोन कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. रामराव पाटील बुलढाणा ( वऱ्हाड ), श्री. ह. भ. प. गंगाधरबुवा रामदासी मु०॥ बीड, श्री. ह. भ. प. नाथबुवा माटेकर व श्री. ह. भ. प. टाकळीकर रामदासी बुवा अशीं चार कीर्तनें झालीं.

**नवल विशेष:**—श्री. अरुणाचल रामराव कंचीकर, फॉरेस्ट सुपरिन्टेंडेंट, पुणें हे माघ व॥ ११ ता. १३–२–५० सोमवार रोजीं सायंकाळची आरती चालू असतां एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून मृत्यु पावले. संस्थान ट्रस्टी, मेंबर, मॅनेजर, नोकर व सेवेकरी वगैरेंच्या मदतीनें व्यवस्था उत्तम झाली. श्री. द्वारकानाथ जगताप, पुणतांबे यांनीं संगीत गायनवादनाचीं हजेरी दिली. महाशिवरात्रीनिमित्त गांवांतून पालखीची मिरवणूक झाली.

नवीन बांधकाम व दुरुस्तीकाम चालू आहे.

हवापाणी उत्तम आहे.

## माहे मार्च १९५०

या महिन्यांत बाहेरगांवचे बरेच भक्त श्रीचे दर्शनास आले होते. रामनवमीचा उत्सव याच महिन्यांत झाल्यानें उत्सवांत भक्तांची बरीच गर्दी झाली होती. उत्सवप्रसंगीं भक्तांचे श्रींचे दर्शनास येण्याचें मान सालोसाल वाढतच आहे.

**देणगी:**—या महिन्यांत एकूण ७६ भक्तांकडून श्रीसाठीं निरनिराळ्या देणग्या आल्या आहेत.

**धर्मकृत्य:**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे नेहमींप्रमाणें यथासांग विधी झाले. एका भक्ताची श्रीसत्यनारायणाची पूजा श्रीमंदिरांत झाली.

**कीर्तन**:—संस्थान गवई यांची या महिन्यांत श्री. तुकाराम बीज. श्री एकनाथ-षष्ठी, फा. व. ११ व गुढीपाडवा अशीं चार कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. अनंत दामोदर आठवले, श्री. ह. भ. प. तुकाराम केशवगुरु आजेगांवकर, कुमार-भगवान आजेगांवकर व श्री. ह. भ. प. दत्तोपंत कस्तुरे यांचीं चार कीर्तनें श्रीपुढें झालीं.

**नवल विशेषः**—शाहीर रामचंद्र सावळे बडोदा यांनीं श्रीपुढें पोवाड्याची हजेरी दिली. श्री. रंगनाथ कचरू श्री. पिरोजाबाई दस्तूर, रेडियोस्टार-मुंबई, श्री. सुंदराबाई भायेगांवकर व श्री. वेणूबाई शिर्डिकर वगैरे मंडळींनीं श्रीपुढें संगीत गायन व भजनाची हजेरी दिली. श्री. महादेवबुवा खंदारे यांचें कीर्तन झालें. कु. कुमुदिनी खांडेकर व त्यांच्या दोन बहिणी मुंबई यांनीं श्रींपुढें पोवाडेगायन केलें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

## माहे-एप्रिल १९५०

बाहेरगांवचे बरेच भक्त श्रींचे दर्शनास या महिन्यांत येऊन गेले.

**देणगीः**—या महिन्यांत एकूण २६ भक्तांकडून निरनिराळ्या प्रकारच्या देणग्या ( वस्तू ) श्रींस अर्पण झाल्या आहेत.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, अर्चन, पूजा, लघुरुद्र, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे विधी यथासांग पार पडले.

**कीर्तनः**—या महिन्यांत संस्थान गवई यांचीं चैत्र व०॥ ११ श्री अक्कलकोट स्वामी पुण्यतिथि, श्रीपरशुराम जयंती, वशाख शु०॥ ११ अशीं चार कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार ह. भ. प. टाकळकर रामदासीबुवा यांचें नृसिंह जयंतीनिमित्त कीर्तन झालें. श्रीमती द्वारकाबाई जोशी मालेगांव व श्री. ह. भ. प. बापुराव तांब्रोळकर, पंढरपूर यांनीं कीर्तनाची हजेरी दिली.

**नवलविशेषः**—श्रीसमाधीमंदिरापुढील सभामंडपाचे कामास सुरवात झालेली आहे.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

## —ः श्री रामनवमी उत्सव ः—

आधुनिक संतचूडामणि श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज, संस्थान शिर्डी यांचा श्री रामजयंती उत्सव दरवर्षाप्रमाणें चैत्र शु०॥ ८ शके १८७२ सोमवार तारीख २७ मार्च १९५० रोजीं चालू होऊन चैत्र शु०॥ १२ शुक्रवार तारीख ३१ मार्च १९५० रोजीं समाप्त झाला.

उत्सवाची सुरवात सोमवार तारीख २७-३-५० रोजीं झाली. त्या दिवशीं रोजच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त संध्याकाळीं ५ ते ७ पर्यंत कीर्तन व रात्रौ कु. कुमुदिनी खांडेकर यांचें पोवाडे-गायन झालें. मंगळवार ता. २८ रोजीं अभिषेक वगैरे विधी

सकाळीं ८ वाजण्यापूर्वीच उरकून घेतले व नंतर अनेक उत्साही भक्तांनीं कोपरगांवच्या श्रीगोदावरी माईचें कावडींतून आणलेल्या पाण्यानें श्रींचे समाधीस स्नान घातलें. नंतर समाधीस वस्त्रें व पुष्पें अर्पण केल्यावर लागलीच रामजन्मोत्सवाचें कीर्तन चालू झालें. कीर्तनानंतर आरती होऊन तीर्थसप्राद वांटण्यांत आला. संध्याकाळीं रथाची व निशाणाची मिरवणूक निघाली. रात्रौ मयुर नाट्यमंडळ मुंबई यांनीं बसविलेल्या **रायानंद** या नाटकाचा **प्रयोग** झाला. याच दिवशीं शोभेचें दारूकाम झालें. बुधवार तारीख २९-३-१९५० रोजीं सकाळीं श्री. घाडगे यांचें 'योगसाधन' या विषयावर व्याख्यान सप्रयोग झालें व संध्याकाळीं कीर्तन झालें. गुरुवार ता. ३०-३-५० रोजीं नेहमींच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त सायंकाळीं कीर्तन व रात्रौ श्रींचे पालखीची मिरवणूक झाली. त्याबरोबरच गारूड झालें (गारूड-ललितासारखा एक प्रकार). त्या गारुडांत संस्थानच्या नोकरवर्गानें व जमलेल्या भक्तगणांनीं उत्साहानें भाग घेतला होता. शुक्रवार ता. ३१-३-१९५० हा उत्सवाचा शेवटचा दिवस. त्या दिवशीं गोपाळकाला कीर्तन होऊन तीर्थप्रसाद सर्वांस वाटण्यांत आला व उत्सव समाप्त झाला. उत्सवांत कुस्त्यांचा हगामा झाला त्याबद्दल विजयी वीरांना संस्थानकडून बक्षिसें देण्यांत आलीं.

या उत्सवाकरतां बाहेरगांवच्या बऱ्याच भक्तांची गर्दी होणार असा कयास असल्यानें लोकांस उतरण्याकरतां मांडव घातला होता. व विशेष म्हणजे विजेच्या दिव्यांची रोषणाई मात्र या वर्षी प्रथमच होत आहे. सर्व भक्तांची सोय संस्थान कमिटीनें उत्तमप्रकारें केली होती; पण सरकारच्या भोजनबंदीमुळें जेवणाची सोय भक्तांसच करून घ्यावी लागली. उत्सवास संस्थानचे ऑ. चिटणीस व ऑ. खजिनदार स्वतः हजर राहून प्रत्येक कार्यक्रमांत भाग घेत होते.

---

## विनंति

(१) १९५० सालाची ज्या सभासदांनीं (साईलीलेची) आपली वर्गणी २-४-० भरली नाहीं त्यांनीं ती ताबडतोब हेडक्लार्क शिरडी संस्थान कमेटी, शिरडी. पो. रहाते, जी. अहमदनगर येथें भरावी.

(२) शिरडी संस्थानच्या ता. ११-६-५० च्या सभेंत कै. गोविंद विनायक वाड यांच्या रिकाम्या जागेवर श्री. सीताराम गोविंद वालावलकर, बी. ए. यांची कमेटीच्या जागेवर निवड झाली.

**विनंतीः**—संपादक डॉ. के. भ. गव्हाणकर यांची प्रकृती नादुरुस्त असल्यामुळें अंक सभासदांच्या हातीं उशीरां पडत आहे त्याबद्दल क्षमा करावी.

संपादक.

# ‘ स्मृति ’

## ( १ ) कै. साने गुरुजी

साने गुरुजी हे मूळचे कोंकणांतील. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत पालगड येथें झाला. त्यांचे वडील वडवली गांवचे खोत होते. त्यांची घरची स्थिति फार गरिबीची होती. या गरिबीनेंच त्यांना जीवनाचें शिक्षण मिळालें व त्यापासूनच त्यांच्या अंगीं सेवावृत्ति बाणली.

गुरुजींच्या घरची गरिबी असतांही अत्यंत कष्टानें व चिकाटीनें त्यांनीं आपलें एम्. ए. पर्यंतचें शिक्षण पुरें केलें. एम्. ए. झाल्यावर १९२४ मध्यें ते अमळनेरच्या ‘ तत्त्वज्ञान मंदिरांत ’ प्रविष्ट झाले. प्रताप हायस्कुलांत शिक्षकाचा पेशा पत्करला, पण १९२९ मध्यें काँग्रेसनें स्वातंत्र्याचा ठराव पास केला अशा वेळीं त्या शाळेच्या लहानशा क्षेत्रांत त्यांचें मन रमणें अशक्य झाल्यानें त्यांनीं हायस्कूल सोडलें व सबंध खानदेशांत आपल्या विजेच्या लखलखाटासारख्या वाणीनें नवचैतन्य निर्माण केलें. त्यावेळीं त्यांना धुळ्याचा कारागृह पत्करणें भाग पडलें. त्यांनीं प्रत्येक वेळीं स्वातंत्र्य–संग्रामांत उत्साहानें भाग घेऊन कारावासही पुष्कळ वेळां भोगला.

‘ साने गुरुजींनीं जरी राजकारणांत बरीच कामगिरी केली असली तरी ते राजकारणी नव्हते. दलितांचें दुःख त्यांना राजकारणांत पडावयास भाग पाडी, पण ते खरोखरीचे समाजसेवक होते ’ अशा अर्थाचे उद्गार त्यांच्याविषयींचा मृत्युलेख लिहितांना एका प्रसिद्ध व्यक्तीनें काढले आहेत. ते खरोखरीच महाराष्ट्राला ललामभूत झालेले एक तपस्वी होते. त्यांच्या वैराग्यानें दिपून जाणार नाहीं असा कोण आहे ? निरहंकार, निर्वैर आणि निस्पृह हे साधुत्वाचे गुण त्यांच्या अंगीं नव्हते असें कोण म्हणेल ? द्रव्याची व मानाची अपेक्षा न करतां त्यांनीं आपले प्राण पणाला लावून, वाममार्गानें जाणाऱ्या समाजाला वेळोवेळीं सरळ मार्गावर ठेवण्यासाठीं पराकाष्ठेचा आत्मयज्ञ केलेला नाहीं काय ?

साधुत्वाला भेदाभेद अमंगल वाटत असतात. जात, धर्म व उच्चनीचता यांच्या पलिकडे जाऊन दुःखितांची सेवा करावी, दलितांचा उद्धार करावा आणि भयग्रस्तांना अभय द्यावें यांतच त्यांना आपल्या जीवनाचें साफल्य वाटत असतें. पक्षभेद, द्रव्यभेद, मतभेद, द्रव्यलालसा व सत्ताभिलाष यांमध्यें त्यांचें मन कधींच गुंतून राहिलें नाहीं. त्यांत गुंतून राहिल्यास आपल्या सेवाधर्मास बाध येईल अशी शंका त्यांस नेहमीं वाटे.

त्यांनीं आपल्या ५० वर्षांच्या आयुष्यांत २५ वर्षे सार्वजनिक सेवेला वाहिलीं होतीं. त्यांतच त्यांनीं साहित्यसेवाहि बरीच केली आहे. कादंबऱ्या, नाटकें, काव्य, चरित्रें व कथा या वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांतून त्यांच्या लेखणीनें अप्रातिहत संचार केलेला आहे. 'शाम' व 'शामची आई' हीं पुस्तकें त्यांच्या जीवनाचें चित्र डोळ्यांसमोर उभें करतात. त्यांच्या लिखाणांतील प्रत्येक शब्द वाचकाच्या हृदयाला पीळ घालीत असतो. त्यांच्या लिखाणांतही दलितांविषयींची तळमळ दिसून येते. पंचवीस वर्षांत त्यांनीं ५० वर पुस्तकें लिहिलीं यावरून त्यांच्या साहित्यसेवेची कल्पना येईल.

गुरुजींची मूर्ति ठेंगणी, वागणूक अत्यंत शालिनतेची, चेहऱ्याभोंवतीं तपःश्चर्येचें तेज, स्वानुभवाचे बोल आणि प्रत्येक शब्द हृदय पिळवटून बाहेर पडणारा. कित्येक वक्त्यांचें मेंदू बोलतात. पण गुरुजी जेव्हां जेव्हां भाषण करीत तेव्हां तेव्हां त्यांचें हृदयच बोलत आहे असा श्रोत्यांस भास होई.

**'मेणबत्तीप्रमाणें स्वतः जळून लोकांना थोडा तरी प्रकाश देतां आला तर माझें जीवित धन्य होईल'** हें साने गुरुजींचें वाक्य त्यांच्या समाजसेवेविषयींच्या तळमळीची कल्पना करून देण्यास समर्थ आहे.

दलितांचा देव, गरिबांची विठाई माऊली, मध्यस्त दलालांच्या—बडव्यांच्या अडचणीमुळें आपल्या हरिजन लेकरांपासून दूर राहिली होती. विठाई माऊलीच्या वाळवंटांत विटाळ नव्हता, पण तिच्याशीं तिच्या हरिजन लेकरांचीं भेट होत नव्हती. युगेंयुगें दूर राहिलेल्या या मायलेकरांची भेट करून देणाऱ्या व गांधींजींच्या हत्येच्या पापक्षालनार्थ महाराष्ट्राच्यावतीनें उपोषण करणाऱ्या, आपल्या त्यागी व सेवावृत्तीनें साऱ्या भारताला आदरणीय झालेल्या या महाराष्ट्राच्या आधुनिक संताचा आत्मा रविवार ता. ११ जून १९५० रोजीं पहांटे ४ वाजतां अनंतांत विलीन झाला: ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देईल यांत शंका नाहीं.

शिरडी संस्थान कमेटीच्या ता. ११–६–५० च्या सभेंत, सर्व सभासदांना अध्यक्ष पी. के. सावंत यांच्या समवेत २ मिनिटें स्वस्थ राहून त्यांच्याविषयींची सहानुभूति व दुःख प्रदर्शित केलें व अमर आत्म्यास चिरंतन शांति लाभो अशी श्रीसाईकडे प्रार्थना केली.

---

२

# कै. गोविंद वाडः—

कै. गोविंद विनायक वाड हे शिरडी संस्थान कमिटीचे १९४६ पासून सभासद होते. प्रथम ते जॉइंट सेक्रेटरी या हुद्यावर होते. पण ते सरकारी नोकरींत असल्यामुळें व कामाचा बोजा फार पडत असल्यानें त्यांनीं संस्थानचें जॉइंट सेक्रेटरीपद सोडून दिलेलें होतें व ते नुसते सामान्य सभासद म्हणूनच राहिले. काम कितीही असलें तरी संस्थान कमिटीच्या सभेस हजर राहण्याचा शक्य तों ते प्रयत्न करीत असत. संस्थानाविषयीं व श्रीसाईबाबांविषयीं त्यांना नेहमीं आपलेपणा वाटत असे.

ते स्वभावानें मनमिळावू, सदैव हंसतमुख व गोड स्वभाव यामुळें ते त्यांच्या मित्रमंडळींत प्रिय असत. ते कोणासही कठोर शब्द बोलून सहसा दुखवीत नसत. ते नेहमीं श्रीसाईबाबांच्या कामामध्यें हिरीरीनें भाग घेत असत. कोणत्याही कामांतील त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

अशा या शिरडी संस्थानच्या कार्यकर्त्यांचा अकालीं मृत्यु झाल्याबद्दल परिचयाच्या माणसांस हळहळ वाटल्यास नवल नाहीं.

शिरडी संस्थान कमिटीनें ता. ११–६–१९५० रोजीं भरलेल्या सभेंत त्यांच्याविषयीं दुःखवट्याचा ठराव पास करून त्यांच्या कुटुंबियांकडे पाठविला आहे.

श्री सद्गुरु श्रीसाईमाऊली त्यांच्या आत्म्यास आपल्या चरणीं चिरशांति देवो हीच विनंति.

संपादक.

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. आ. पै |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र ( मराठी ) .... ... | ७-०-० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) .... .... | ४-०-० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ०-२-० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ०-८-० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ०-३-० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) .... .... | १-४-० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर**

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :-**डॉ. के. भ. गव्हाणकर** यांनीं, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :-**के. एन्. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४**